## अनुक्रम


**अतिथी संपादकीय**
राहुल कोसम्बी ५

**समसामायिक**
**रशिया-युक्रेन संघर्ष व जागतिक राजकारण** ८
रोहन चौधरी
**भारतासमोरील वाढली आव्हाने** ११
परिमल माया सुधाकर

**महाराष्ट्र**
**विकास आणि प्रादेशिक विषमता** १५
श्रीनिवास खांदेवाले व धीरज कदम

**अर्थकारण**
**कुणाच्या खांद्यावर, कुणाचे ओझे** २१
वसंत देशमाने

**सावित्रीची पानं**
**उच्च शिक्षण व लिंगभाव** २४
नुपूर जैन

**अभ्यास**
**डॉ. आंबेडकर आणि धर्मांतर** – भाग २ २८
चैतन सोनावले

**शोध परिसरनीतीचा**
**आणीबाणीच्या उंबरठ्यावर** ३४
अनिल सावंत

**माध्यमा**
**मराठी मालिका : लिंगभावी दृष्टिकोनातून** ४०
रेणुका कड व प्रवीण घोडेस्वार

**चित्रपट**
**भिंतीपल्याडचा भारत रेखाटणारा 'झुंड'** ४३
प्रबुद्ध मस्के

**आपण हे वाचलंय का?**
**न्यूज ऑफ ए किडनॅपिंग** ४७
सत्येन होंबाळी

**कविता**
भगवान फाळके ५०
शशिकांत हिंगोणेकर ५०



अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

▌माध्यमा▌

# मराठी मालिका : लिंगभावी दृष्टिकोनातून

रेणुका कड
व
प्रवीण घोडेस्वार

सध्या दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांवर सोमवार ते शनिवार अशा दररोज प्रक्षेपित होणाऱ्या अनेक लोकप्रिय मालिका (डेली सोप्स) सुरू आहेत. या मालिकांचा मोठा प्रेक्षकवृंद (दर्शक) असल्याचे दिसून येते. त्यातही महिला प्रेक्षकांची संख्या पुरुषांच्या तुलनेत अधिक असल्याचे सांगण्यात येते. या मालिकांमधून करण्यात आलेले स्त्री आणि पुरुष पात्रांचे चित्रण सध्याच्या आधुनिक काळाशी सुसंगत नसल्याचे स्पष्टपणे आढळते. परंपरागत, सनातनी, प्राचीन, बुरसटलेल्या मूल्य विचारांचा प्रसार आणि प्रचार यातून करण्यात येत असल्याचे जाणवते. हे विचार कधी थेटपणे तर कधी छुप्या पद्धतीने मांडलेले दिसतात. अशा मालिका पाहणाऱ्या लोकांच्या वैचारिक जडण-घडणीवरही त्याचे परिणाम होतात. या मालिका लोकांची विशिष्ट मनोभूमिका कळत नकळतपणे तयार करत असतात. ह्या मालिका एक प्रकारे स्लो पॉयझनिंगचे काम करतात, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. पाहणाऱ्यांच्या मनावर, मेंदूवर आणि मनोधारणेवर याचा खोलवर परिणाम होत असतो. मालिकेचा 'टीआरपी' कमी होऊ नये म्हणून कथानकात अकल्पित, धक्कादायक बदल करण्यात येतात, हादेखील अजून चर्चेचा मुद्दा आहे. पण आपला विषय हा नसल्याने त्याबाबत या लेखमालेत भाष्य केलेले नाही. कारण तो एक महत्त्वाचा आणि स्वतंत्र विषय आहे. या लेखमालेतून प्रत्येक मालिकेचे कथानक, त्याचा आशय, त्यातील पुरुष व स्त्री पात्रांचा दृष्टिकोन आणि स्त्री पात्रांचे नकारात्मक चित्रण अशा घटकांची लिंगभावाच्या परिप्रेक्ष्यातून चर्चा केली आहे.

छोट्या पडद्यावरची 'आई कुठे काय करते' ही लोकप्रिय मालिकांपैकी एक आहे. स्टार प्रवाह चॅनेलवर ही मालिका सुरू आहे. अरुंधती आणि अनिरुद्ध देशमुख ही या मालिकेतील दोन मुख्य पात्रे आहेत. ह्या मालिकेत अरुंधती ही एक मध्यम वयाची तीन मुलांची आई असलेली गृहिणी आहे. तिचा पती कॉर्पोरेट क्षेत्रात प्रगती करणारा यशस्वी पुरुष आहे. सासू-सासरे, यशस्वी पती, डॉक्टर झालेला मुलगा (अभिषेक), संगीत क्षेत्रात करियर करू पाहणारा दूसरा मुलगा (यश) आणि नुकताच कॉलेजमध्ये प्रवेश करणारी मुलगी (ईशा) असं हे कुटुंब आहे. अरुंधती या मध्यमवयीन गृहिणीने आपले संपूर्ण जीवन पती, सासू-सासरे आणि मुलांसाठी समर्पित केले आहे. सगळ्यांच्या आवडी-निवडी, खाण्याच्या वेळा, सासू-सासऱ्यांची काळजी अशी सगळी कामे चोख करणारी ती दक्ष गृहिणी आहे.

लेखिका मुंबईस्थित विकास अध्ययन केंद्रात कार्यरत असून लेखक नाशिकस्थित यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे प्रभारी संचालक आहेत.
ईमेल - rkpatil3@gmail.com
gpraveen18feb@gmail.com

गृहिणी म्हणून तिच्या कामाचे आणि त्यागाचे कोणीही कौतुक करीत नाही. किंबहुना सगळ्यांची कामे करणे हे तिचे कर्तव्य आणि जबाबदारीच आहे, हेच सगळ्यांनी गृहीत धरलेले आहे. घरात तिचा दुसरा मुलगा यश आणि सासरे सोडून तिच्या कामाची कोणी कधी दखल घेत नसतात. हे दोघे मात्र तिच्या कामाची, स्वभावाची, वृत्तीची दखल घेऊन तिचे कौतुक करतात. तिला प्रोत्साहन देतात. मुलीच्या शाळेत एका स्पर्धेदरम्यान, मुलगी वडिलांची सहकारी असलेल्या स्त्रीला वडिलांसोबत तिच्याबरोबर शाळेत घेऊन जाते. तर दुसरीकडे मुलीला स्पर्धेमध्ये मदत करण्यासाठी अरुंधतीही काही क्राफ्टच्या वस्तू तयार करून घेऊन जाते. त्या ठिकाणी अरुंधतीला अनपेक्षितपणे 'बेस्ट मदर' हा सन्मान मिळतो. नंतर, शाळा अधिकारी तिला मुलीच्या शाळेत नोकरी देतात. ती नोकरी स्वीकारते परंतु नवऱ्याने आधीच तिला माझ्या आई-वडिलांकडे किंचितही दुर्लक्ष झालेले चालणार नाही अशी धमकी वजा सूचना दिलेली असते. मुलीला वाटतं आपल्या आईला इंग्लिश बोलता येत नाही. ती शाळेत आल्यामुळे आपले हसे होईल अशी तिची भावना झालेली असते. म्हणून मुलगीही आईवर नाराज होते. आपल्या वडिलांची सहकारी असलेली संजना किती हुशार, छान आहे असे मुलगी - ईशा अरुंधतीला नकळत बोलून जाते. सुनेने नोकरी करायची गरजच काय आहे अशी तक्रार सासूने सुरू केलेली असते. या सगळ्यातून मार्ग काढत अरुंधती नोकरी स्वीकारते. मात्र कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे ती चांगली कामगिरी करू शकत नाही, परिणामी तिला शाळेतून काढून टाकण्यात येते. अशा पद्धतीने अरुंधतीचा संसार गाडा सुरू असतो.

पुढे तिच्या लग्नाला पंचवीस वर्ष पूर्ण होतात म्हणून आपल्या आई-वडिलांचे पुन्हा लग्न करायचे असे ठरवले जाते. तिच्या लग्नाच्या पंचविसाव्या वाढदिवसाच्या दिवशी तिच्याच बेडरूममध्ये अनिरुद्धला संजनासोबत एकत्र पाहते. त्याक्षणी मानसिकदृष्ट्या अरुंधती प्रचंड खचून जाते. तिला तिच्या नवऱ्याच्या अशा वागण्याचा प्रचंड धक्का बसतो. हे तिच्यासाठी अगदी अनपेक्षित असते. मनाने खंबीर होत ती पुन स्वतःला सावरते. पतीपासून कायदेशीररित्या घटस्फोट घेऊन वेगळे होण्याचा निर्णय घेते. हळूहळू ही गोष्ट घरात सर्वांना कळते. तिने घटस्फोट घेऊन नये. झाले गेले विसरून जाऊन तिने नवऱ्यासोबतच राहावं हा अप्रत्यक्षरित्या सल्ला दिला जातो. येथूनच खऱ्या मालिकेचा प्रारंभ होतो.

अरुंधती तिच्या निर्णयावर ठाम राहून नवऱ्यापासून वेगळी होते. पुढे अनिरुद्ध संजनासोबत दुसरे लग्न करतो. आपण स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे ही भूमिका स्वतःशी पक्की करत अरुंधती एका महिलांच्या आश्रमात नोकरी स्वीकारते. ऑफिसच्या कामाची मॅनेजमेंट सांभाळणे तिला सुरुवातीला जड जाते तरीही यातून मार्ग काढत अरुंधती आपल्याला काहीतरी करायचं आहे ह्या मतावर ठाम असते. तिला गाण्याची आवड असते म्हणून ऑनलाइन गाण्याचे क्लास घेणे, महिला आश्रमात महिलांसाठी क्राफ्ट आणि गाणे शिकवणे यातून तिला पुढे जाण्याची उमेद मिळते. यातच तिची तिच्या कॉलेजमधील मित्राची अनेक वर्षांनंतर पुन्हा भेट होते. त्याच्या माध्यमातून तिला गाण्याच्या अल्बममध्ये गाणे गाण्याची संधी मिळते आणि योग्य मोबदलाही मिळतो.

अरुंधती ही सगळी कामे करत असतांना सासर आणि मुले यांच्यापासून स्वतःला वेगळे ठेऊ शकत नाही. घरात तिचा वावर पूर्वी जसा होता तसाच आताही असतो. तिचा नवरा तिच्याशी आजही तसाच हक्क गाजवतो जसा पूर्वी गाजवत होता. मात्र अरुंधती त्याला वेळोवेळी तुमचा आता काय संबंध म्हणून प्रश्न करत असते. अरुंधतीचा मुलगा अभिषेक याच्या लग्नात तिचा मित्र आशुतोष आणि नितीन हे सहभागी होतात. लग्नाच्या संगीत कार्यक्रमात एकत्र नाच करतात. ही गोष्ट अनिरुद्धला प्रचंड खटकते. त्याच्या रागाचे कारण

संजना त्याला विचारते तेव्हा, 'ह्या घरात माझी कोणाला किंमत नाही'. 'मी लग्नात नाही आलो तरी माझ्या आईशिवाय कोणालाच काही फरक पडणार नाही'. 'जेव्हा पासून आशुतोष आलाय तेव्हापासून सगळे 'आशुतोष बाबा'च्या नादी लागले आहेत'. तो अत्यंत फ्रॉड माणूस आहे. यावर संजना त्याला तो अरुंधतीला इम्प्रेस करायला असे करतो असे तुला वाटते का? असे जेव्हा विचारते तेव्हा there you are असे अनिरुद्ध म्हणतो. 'अरुंधतीला हे शोभत नाही'. 'ती तीन मुलांची आई आहे'. 'डिव्होर्सी आहे'. 'या वयात तिने असे वागू नये'. 'कोणाला रिस्पॉन्स देऊ नये'. 'तिला तिच्या चारित्र्याची काळजी नाही'. यावर संजना त्याला तुलाही तीन मुले आहेत असे बोलते. तेव्हा यावर तू तिची आणि माझी तुलना करू नकोस.'ती बाई आहे; मी पुरुष आहे'. 'हा बेसिक फरक आहे', असे संजनाला ऐकवतो. 'मला अरुंधती आणि आशुतोषची मैत्री अजिबात मान्य नाही'. 'दुसरा कसा कोणी तिच्याजवळ येऊ शकेल'? असे बोलून राग व्यक्त करतो.

अरुंधती आपली फसवणूक झाली हे समजल्यानंतर ठामपणे नवऱ्यापासून विभक्त होण्याचा निर्णय घेऊन पुढचे आयुष्य आपण आपल्यासाठी जगायचे यासाठी धडपड करणारी एक स्त्री. तर अनिरुद्ध बायकोवर कायदेशीर कोणताही हक्क उरलेला नाही तरीही तिच्यावर हक्क गाजवू पाहतो. तिला मित्र कसा असू शकतो इथपासून ते ती घराबाहेर पडून काम कसे करू शकते; याची तिला सतत जाणीव करून देणारा पुरुष. तो तीन मुलाचा बाप असला तरी त्याचे दुसरे लग्न गैर किंवा त्याच्या चारित्र्याविषयी संशय निर्माण करणारे आहे असे त्याला अजिबात वाटत नाही. किंबहुना त्याची मुले लग्नाच्या वयाची असतानाही त्याने केलेले दुसरे लग्न त्यात काहीच गैर नाही असे तो मानतो तर घरस्फोट घेतलेल्या बायकोने अजूनही आपले ऐकलेच पाहिजे हा त्याचा आग्रह नव्हे, हट्टच असतो.

याच मालिकेतील दुसरे पात्र अनघा या मुलीचे आहे. अनघाचे परदेशी नोकरी करणाऱ्या मुलासोबत लग्न झालेले असते. परदेशी गेल्यावर तिचा नवरा तिच्यावर प्रचंड हिंसाचार करतो. त्यामुळे तिने नवऱ्याच्या विरोधात पोलिस तक्रार करून कायदेशीर घटस्फोट घेतलेला असतो. आता ती एकटी स्वतंत्रपणे तिचे आयुष्य जगत असते. ती व्यवसायाने डॉक्टर असलेल्या अभिषेकच्या प्रेमात पडते आणि पुढे त्यांचे लग्न ठरते. हे जेव्हा तिच्या पहिल्या नवऱ्याला कळते तेव्हा तो तिचे लग्न मोडण्याच्या उद्देशाने तिला रस्त्यात अडवून तिच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करतो. तिच्या लग्नात येऊन तिच्या सासूला चाकूचा धाक दाखवून हे लग्न थांबविण्याचा आग्रह करतो. यामागे कारण काय तर अनघाने त्याच्याविरुद्ध पोलिस तक्रार करून घटस्फोट घेतला होता. त्यामुळे त्याची आणि त्याच्या आईवडिलांची खूप बदनामी झाली. त्याला परदेशातील नोकरी सोडावी लागली. माझ्याशिवाय दुसऱ्या कोणासोबत तिचे लग्न कसे होऊ शकते. काही झाले तरी मी तिचे लग्न होऊ देणार नाही. मी तिच्या होणाऱ्या नवऱ्याला मारून टाकीन अशी धमकी देतो.

ह्या मालिकेतील दोन्ही पुरुष, वेगवेगळ्या वयोगटातील आहेत. एकाचा पंचवीस वर्ष संसार होता तर दुसऱ्याचे नवीन लग्न होते. दोघेही शैक्षणिक स्तर म्हणून पाहिले तर उच्च शिक्षित आहेत. पण दोघांची आपली बायको / जोडीदार म्हणजे तिच्यावर आपला मालकी हक्क आहे हे गृहीत धरूनच तिच्याकडे पाहतात. आपल्या शिवाय तिच्या जीवनात दुसरा पुरुष कसा येऊ शकतो? एकदा लग्न झाले की स्त्रीवर आपला मालकी हक्क प्रस्थापित होतो, असा त्याचा पुरुषी वर्चस्ववादी विचार असतो. त्यामुळे आपण तिच्यासोबत कसेही वागू शकतो ही मानसिकता असलेला पुरुष यातून दाखवला गेला आहे. ●

परिवर्तनाचा
# वाटसरू

वर्ष २१वे / अंक २२वा / किं. २५ रु. / १६ ते ३१ मार्च २०२२

**संस्थापक संपादक**
अभय कांता*

**संपादक**
प्रज्ञा दया पवार । नारायण भोसले । माधुरी दीक्षित । सुरेंद्र जोंधळे

**कार्यकारी संपादक**
देवेंद्र इंगळे । दिलीप चव्हाण

**संपादक मंडळ**
प्रज्वला तट्टे । वीरा राठोड । कलीम अजीम । राही श्रु. ग. । वृषाली मगदूम

**सहव्यवस्थापक**
प्रकाश वाघमारे

**संपर्क पत्ता**
५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
भ्र. ९७६३२०६२१२ इमेल : pwatsaru@yahoo.com वेबसाईट : www.pvatsaru.com

**वर्गणीचे दर** : वार्षिक : ६०० रु., त्रैवार्षिक : १,६०० रु., दशवार्षिक : ५,००० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक २०० रु., सॉफ्ट + छापील ७०० रु. वरील पत्त्यावर ई मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे । बचत खाते : Pariwartanacha Vatsaru
बचत खाते क्र. : 051410110013969 । आयएफएससी क्र. : BKID0000514 । एमआयसीआर क्र. : 411013014
Google Pay साठीचा मोबाईल नंबर : 8888708963 । युपीआय पेमेंटसाठी वर बारकोड दिला आहे.

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

ISSN: 2250-3145

युजीसी केअर ग्रुप 1मध्ये 'परिवर्तनाचा वाटसरू' पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.